विशेष दिवाणी दावा क्र.७/२०१९
अनुसया वि. शासन
वादीतर्फे सा.क्र.७
**(नि.क्र.१३२)**

**<u>शपथेवर सत्य कथन करतो की,</u>**

**माझे नांव:-कृष्णा रामकृष्ण पवणेकर**, **वय:- ५८** वर्षे,

**व्यवसाय:-** नौकरी, **रा. सुयोग नगर, नागपूर**.

**<u>सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.साबणे यांच्यामार्फत सुरु.</u>**

**०१.** मी दि.०४/०८/१९८८ पासून मी महालेखाकार कार्यालय, नागपूर येथे कार्यरत असून सुरुवातीला लिपीक म्हणून भरती झालो आणि आजरोजी पर्यवेक्षक म्हणजे सुपरवायझर या पदावरतील कार्यरत आहे. दि.१८/०६/२०२५ पासून मी पेन्शन विभागामध्ये कार्यरत आहे. माझ्याकडे लातूर आणि बीड या दोन जिल्हातील शासकीय सेवकांच्या निवृत्ती पश्चात त्यांना द्यायचे लाभ आमचा विभाग करतो. आमचा अभिलेख कक्ष अद्ययावत आहे आणि त्यात सर्व रेकार्ड उपलब्ध आहे.

**०२.** दि.१४/०३/२०२० रोजीचे शिवाजी महाविद्यालय, उदगीर यांच्याकडील एक पत्र आमच्या कार्यालयात आले होते का यास माझे उत्तर की, मला या प्रकरणी साक्ष देण्यासाठी कोर्ट फाईल जी देण्यात आली, त्यामध्ये असे पत्र दिसून येत नाही. त्या पत्रामध्ये सुलेखा व जनाबाई यांच्या लग्नाबद्दलचा लेखी पुरावा पाठवला आहे किंवा कसे हे माझ्याकडे पत्रच नसल्यामुळे मला सांगता येणार नाही. मी आमच्या कार्यालयाकडील संपुर्ण न्यायालयीन प्रकरणाची फाईल आणलेली आहे. शिवाजी महाविद्यालयाने पाठवलेले कागदपत्रे आमच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. कोर्ट केस सेलमध्ये अशी कागदपत्रे नाहीत. मी आणलेल्या फाईलमध्ये हा कागद दिसून येत नाही. सुरेखाने ती या पेन्शनची हक्कदार आहे अशा स्वरुपाचा आक्षेप घेणारा अर्ज आमच्याकडे शिवाजी कॉलेजमार्फत दिला होता. या आक्षेप अर्जाच्या अनुषंगाने आमच्या कार्यालयाने जनाबाईची पेन्शन थांबवली किंवा कसे याबद्दल मला सांगता येणार नाही. या अनुषंगाने आमच्या

कार्यालयाने उपसंचालक नांदेड शिक्षण विभाग यांच्याकडे पत्र देवून या अनुषंगाने अहवाल देण्यासाठी आदेशीत केले. तसेच जनाबाई यांची पेन्शन बंद करावी असे त्यांना त्याच पत्राने कळविले. उपसंचालक, नांदेड यांनी जनाबाईची पेन्शन बंद केल्याबद्दल आम्हाला कळविले नाही.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास प्रतिवादीतर्फे श्री.डी.एल.घोगरे वकील यांच्यामार्फत सुरु.**

**०३.** हे खरे की, जनाबाई यांना मंजूर झालेली पेन्शन कायदेशीर कागदपत्रांची पुर्तता करुन मंजूर झालेली आहे. हे खरे की, पेन्शन कागदांमध्ये फार्म क्र.१, ३ व ४ हे महत्त्वाचे असतात. हे खरे की, फार्म क्र.१ हा नामनिर्देशणाचा आहे. हे खरे की, त्यात जनाबाईचे नाव आहे. हे खरे की, मोहनरावच्या कायदेशीर कुंटूंब सदस्याचे नाव आहे. हे खरे की, फार्म क्र.३ मध्ये मोहनरावच्या कुंटूंबाचे विवरण आहे. हे खरे की, त्यात जनाबाईचे नाव असून सुलेखा किंवा अनुसया यांचे नाव नाही. हे खरे की, फार्म क्र.४ हा नामनिर्देशणाचा आहे. हे खरे की, त्यातही जनाबाई यांचेच नाव आहे. हे खरे की, आमच्याकडील मोहनराव यांच्या पाठवलेल्या पेन्शन फाईलवर मोहनराव व त्यांच्या पत्नी यांचा फोटो आहे. तसेच, त्यांच्या सहया आहेत. हे खरे की, त्यावर जनाबाई यांचेच नाव आणि उभयतांचा फोटो आहे.

**०४.** सेवापुस्तकातील नोंदी पाहून आम्ही ते पुन्हा संबंधीत विभागाकडे पाठवून देतो. सेवापुस्तकामध्ये नामनिर्देशण जे आहे ते आमच्याकडील प्रमाणपत्रांमध्ये उल्लेखीत असते. हे खरे की, सेवापुस्तकातसुध्दा जनाबाई यांचेच नामनिर्देशण आहे. पेन्शनसाठी कागदपत्रे तयार होत असताना आणि ती कागदपत्रे आमच्या ऑफीसात दाखल झाल्यानंतर त्या संचिकेतील फार्म क्र.१, ३, ४ व सेवापुस्तकातील नोंदी याबाबत आमच्या कार्यालयात कुठलाही आक्षेप दाखल झाला नाही. त्यातील उमटवलेल्या अंगठयांबद्दलही आमच्याकडे आक्षेप आलेला नाही. मी सांगतो की, तसे

असते तर आमच्याकडे पेन्शन फाईल आली नसती. कायदेशीररीत्या पेन्शन सुरु झाल्यानंतर ती थांबविता येत नाही, हे खरे नाही. मी सांगतो की, आक्षेप आला तर ती थांबविता येते. दि.१९/१०/२०१८ रोजी असा आक्षेप विभागीय संचालक, नांदेड विभाग यांनी घेतला आणि पेन्शन थांबविण्याबद्दल कार्यवाही सुरु असल्याचे आम्हाला कळवले, त्यावर आम्ही दि.१६/११/२०१८ रोजी पहिली पत्नी कोण याचा निर्णय घेवून आम्हाला कळवावे त्यानूसार आम्ही पेन्शन स्थगितीबद्दल आदेश देवू असे कळवले. मात्र, आमच्याकडे संबंधीत विभाग संचालक, नांदेड यांच्याकडून अहवाल आला नाही. जनाबाईची पेन्शन आजअखेर थांबलेली नाही याबद्दल मला माहिती नाही.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष
स्वाक्षरीत/-

**( एस.एन.सरडे )**

दिनांक २४/११/२०२५. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.